Lalita Gandbhir
4200 North Ocean Drive
1501 - 2
Singer Island, FL 33404
U.S.A.
lalitagandbhir@hotmail.com
First Serial Rights

# बीचवरती आजी आणि आजोबा

अमेरिकेत आलेल्या आजी आजोबांस घेउनी

उन्हाळ्यात गेलो आम्ही बीचवरती.

बीचवरच्या बिकिनीमधल्या सुंदऱ्या पाहुनी

वाटू लागली आजीस काळजी किती.

“असेच दोन तुकडे लेवूनी माझ्या नाती

फिरणार काही बीचवरती ?

धुळीत मिळेल ना रिवाजरीती.

अन् आपुल्या घराण्याची कीर्ति”

आजोबांची नजर भिरभिरत होती

ते मनोहर दृश्य टिपत होती

“आज व्यर्थ कशास काळजी उद्याची !

आठव जरा अजंठ्याच्या लेण्यातील मूर्ती.

आपल्या शकुंतला, मत्स्यगंधा, मेनका अन् पार्वती

इकडे आहे अशीच जनरिती.

नाही बिघडत कुणाची जनरिती”

असे बोलुनी आजीस निरुत्तर करुनी

गुंगले आजोबा पुन्हा पहाण्यात अवतीभवती.

(पूर्वप्रसिद्धी एकता १९७९-१९८२)